# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय

रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे

फोन नं ०२२-२९४५१००१

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट क्र. १९६** **दिनांक २०/०७/२०२१**

## कर्तव्यनिष्ठ व प्रामाणिक पोलीस अंमलदारामुळे महिलेचा हरवलेला मोबाईल मिळाला परत.

दिनांक १८/०७/२०२१ रोजी सायंकाळी १७.३० वा. चे सुमारास श्री. विजयकांत सागर, पोलीस उप आयुक्त (मुख्यालय), मि.भा.व.वि. हे आयुक्तालय हद्दित गस्त करित असतांना त्यांचेसोबत पो.शि. २१८४ सुदाम महादु बेलदार हे अंगरक्षक म्हणून कर्तव्यावर होते. दरम्यान सृष्टी पोलीस चौकी येथे सिग्नल लागल्याने सरकारी वाहन सिग्नलला थांबले असता पो.शि. सुदाम बेलदार यांना रस्त्याच्या बाजूस बेवारस स्थितीत पडलेला एक मोबाईल हॅन्डसेट दृष्टीस पडला. सदरची बाब त्यांनी श्री. विजयकांत सागर, पोलीस उप आयुक्त यांच्या निदर्शनास आणुन दिली असता त्यांनी सदर मोबाईलचे मुळ मालकाचा शोध घेवून पुढिल कारवाई करण्याबाबत आदेशित केले. त्याप्रमाणे पो.शि. सुदाम बेलदार यांनी सदरचा मोबाईल ताब्यात घेवुन सदर मोबाईलच्या मालकाचा काही बोध होतो का ? याबाबत खात्री करत असताना सदर मोबाईलवर फोन आल्याने सदरचा मोबाईल हा श्रीमती गौरी रामचंद्र पराडकर, व्यवसाय-परिचारीका रा. मुलुंड, मुंबई यांचा असल्याचे समजले. त्यानंतर श्रीमती गौरी रामचंद्र पराडकर यांचेशी संपर्क साधून त्यांना वर्सोवा पोलीस चौकीला बोलावून मोबाईलबाबत खातरजमा करुन सदरचा मोबाईल हा श्रीमती गौरी रामचंद्र पऱ्हाडकर रा. मुलुंड, मुंबई यांना सुपुर्त करण्यात आला.

पो.शि. सुदाम महादु बेलदार यांचे तत्परतेचे व प्रामाणिकपणाचे वरिष्ठ पोलीस अधिकारी यांनी कौतुक केले आहे.

...............ooooo...............